# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव**

**चार : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री** | **:** | | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १३ :- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** | **:** | **(अ)** | सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक १ :- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६ |
| | | | **(ब)** | सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक २ :- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शिक्षण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२६ |
| **(३)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | **:** | | सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ :- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ |

**पाच : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.**

**सहा : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.**

**सात : अध्यक्षांनी, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे.**

**आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

रोटा/एचबी-१०७८ (२,७००-०२-२०२६)-१

**नऊ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, बबनराव यादव (लोणीकर), रामदास मसराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या दिनांक २५ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २० हजार पर्यंत बोनस जाहीर करणे, धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करुन शासनाने आर्थिक संकटातून मुक्त करणे, सन २०२५ मधील सप्टेंबर व आक्टोंबर या महिन्यात अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणे, धान उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने त्यांना बोनस जाहीर करणे अत्यंत आवश्यक असणे, नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा अशी राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांकडून मागणी होणे, माहे सप्टेंबर व आक्टोंबर, २०२५ दरम्यान अवकाळी पावसामुळे झालेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा व आर्थिक संकटाचा विचार करुन धान उत्पादन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार बोनस जाहीर करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.धनंजय मुंडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महामार्गांवर चालविण्यात येत असलेल्या खाजगी स्लीपर कोच बसेसना वारंवार लागणारी भीषण आग व त्यामुळे निष्पाप प्रवाशांचे होरपळून होणारे मृत्यू, या कारणास्तव राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला असणे, दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी समृद्धी महामार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सला आग लागून बस पूर्णतः जळून एका प्रवाशाचा मृत्यू होणे व बसमधील ३२ प्रवासी थोडक्यात बचावणे, यापूर्वी स्लीपर बसला आग लागून माहे जुलै २०२३ मध्ये सिंदखेडराजा येथे २५ प्रवाशांचा, माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये १२ प्रवाशांचा मृत्यूच्या घटना घडलेल्या असणे, अशा घटना वारंवार घडत असूनही ठोस सुरक्षा उपाययोजना झालेली नसणे, चीन-युरोपातील अनेक देशांमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव स्लीपर कोचवर बंदी असताना महाराष्ट्र राज्यात मात्र निकृष्ट दर्जाची अंतर्गत वायरिंग, आपत्कालीन परिस्थिती बाहेर पडण्याच्या व्यवस्थेचा अभाव, तातडीचा इशारा देणारी यंत्रणा अपुरी असतानाही या बसेस राजरोसपणे चालविण्यात येत असणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बसेसच्या सुरक्षा मानकांबाबत होणारे अक्षम्य दुर्लक्ष, चालकांच्या बेफाम वेगामुळे प्रवाशांचे प्राण धोक्यात येत असूनही प्रशासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,

शासनाने या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून बसेसच्या अंतर्गत संरचनेत बदल करण्याचे बंधनकारक नियम लागू करावेत आणि परदेशातील धर्तीवर राज्यात स्लीपर कोचवर बंदी किंवा अत्यंत कठोर सुरक्षा मानके लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. सुनिल प्रभू, चेतन तुपे, राजकुमार बडोले, प्रतापराव पाटील-चिखलीकर, अनिल पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश विटेकर, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. शंकर मांडेकर, संजय केळकर, सुभाष देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत गत वर्षी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ पासून राज्यव्यापी कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेअंतर्गत ३ कोटी ५ लाख नागरिकांची तपासणी केल्यानंतर त्यातून ४१ हजार १६९ संशयीत कर्करुग्णांची नोंद झालेली असणे, तसेच बायोप्सी झाल्यानंतर १६७७ जणांना कर्करोगाचे निदान झाले असून ४१६ रुग्णांवर सार्वजनिक आरोग्य संस्थांमार्फत उपचार करण्यात येत असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास येणे, मुंबई हे शहर फुफ्फुस कर्करोगाचे हॉटस्पॉट बनले असून केवळ धुम्रपान करणाऱ्यांपुरता हा रोग मर्यादीत राहीला नसून शहरातील विषारी हवेमुळे नॉनस्मोकर्सही या रोगाला बळी पडले असणे, मुंबईतील आकडेवारीनूसार फुफ्फुस कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ५७% ॲडेनोकार्सिनोमा, २८% स्क्वॅमस सेल कार्सिनोमा आणि १६% स्मॉल सेल कार्सिनोमा आढळून येणे, निदान झालेल्या कर्करुग्णांमध्ये मुख, गर्भाशय व स्तनाशी सबंधित सर्वाधिक रुग्णांची नोंद करण्यात येणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात वाढते कर्करोगाचे प्रमाण रोखण्यासाठी, शासनाने टाटा या खाजगी रुग्णालयसह शासकीय रुग्णालयांना देखील आवश्यक निधी तातडीने मंजूर करुन औषधोपचार सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**दहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)**

**अकरा : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६.

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६.

बारा : सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी **'AI for Agri २०२६'** ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी.**"**

**तेरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**
**(सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी बॅलेटद्वारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.**

"चेंबूर (मुंबई) येथील आरसीएफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंमली पदार्थाची विक्री होत असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २०९१२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री. राहूल कुल, वि.स.स.**

"दौंड (जि.पुणे) तालुक्यातील श्री शंभो महादेव देवस्थान, राहु व श्री भानोबा मंदिर देवस्थान कुसेगाव यांना "ब" वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळणेबाबत" या विषयावरील श्री.राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ११३२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **जितेंद्र भोळे,** |
| मुंबई, | सचिव-१, |
| दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२६. | महाराष्ट्र विधानसभा. |